THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 12TH OCTOBER 1893.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा आणि हिंदुस्तानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा सुधारण्याबाबत आक्टाचा मसुदा.

सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा आणि हिंदुस्तानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा सुधारणें ज्या अर्थी योग्य आहे; त्या अर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

### सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा.

सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा ह्याच्या ४४ व्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

१. सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा, ह्याच्या ४४ व्या कलमांत खालील मजकूर जास्त दाखल करावाः तो मजकुर येणें प्रमाणें:—

**खुलासा.**—जें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियांत केलें असतें तर हिंदुस्तानच्या पीनल कोडाच्या ३०२ न्या, ३९५ व्या, ३९६ व्या, ३९७ व्या, ३९८ व्या, ३९९ व्या अगर ४०२न्या कलमाअन्वयें शिक्षेस पात्र झालें असतें, तें कृत्य ब्रिटिश इंडियाच्या बाहेरील कोणत्याही जागीं करण्यांत आलें तर, तें, ह्या कलमाच्या कारणासाठीं, सदर्हू कलमाअन्वयें शिक्षेस पात्र असणारें कृत्य होय असें समजलें पाहिजे.

सदर्हू कायद्याच्या ४५ व्या कलमाच्या खुलाशाऐवजीं नवीन खुलासा दाखल करणें.

२. सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा, कलम ४५, ह्याला जोडलेल्या खुलाशाऐवजीं खालील मजकुर दाखल करावाः तो मजकुर येणेंप्रमाणें :—

**खुलासा.**—ह्या कलमांतील—

(१) "गांव" ह्या शब्दांत गांवच्या जमिनींचा समावेश होतो;

(२) "अपराध" ह्या शब्दांत, जें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियांत केलें असतें तर हिंदुस्तानच्या पीनल कोडाच्या ३०२ न्या, ३९५ व्या, ३९६ व्या, ३९७ व्या, ३९८ व्या, ३९९ व्या अगर ४०२ न्या कलमाअन्वयें शिक्षेस पात्र झालें असतें, तें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडिया बाहेरील कोणत्याही जागीं केलें असेल तेव्हां, त्याचाही समावेश होतो; आणि

(३) "अपराधी असल्यावद्दल जाहिरनामा लागलेला" ह्या सञ्ज्ञेत, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांनीं स्थापिलेल्या कोणत्याही कोर्टानें सदहू प्रकारच्या कोणत्याही कृत्यासंबंधानें ज्या कोणत्याही मनुष्याबद्दल हिंदुस्थानाच्या कोणत्याही भागांत तो अपराधी असल्याबद्दल जाहिरनामा लाविलेला असेल, त्या मनुष्याचा समावेश होतो.

## हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा.

हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा ह्याच्या १७७ व्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

३. हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा ह्याच्या १७७ व्या कलमांत खालील मजकुर जास्त दाखल करावाः तो मजकुर येणेंप्रमाणें :—

**खुलासा**.—कलम १७६ ह्यांतील आणि ह्या कलमांतील "अपराध" ह्या शब्दांत, जें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियांत केलें असतें तर ३०२ऱ्या, ३९५व्या, ३९६ व्या, ३९७ व्या, ३९८ व्या, ३९९ व्या अगर ४०२ व्या कलमाअन्वयें शिक्षेस पात्र झालें असतें, तें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियाच्या बाहेरील कोणत्याही जागीं केलें असेल तेव्हां अगर करावयाचा इरादा असेल तेव्हां त्याचाही समावेश होतो; आणि "अपराधी" ह्या शब्दांत, ज्या कोणत्याही मनुष्यानें असें कोणतेंही कृत्य केलें ह्मणून ह्मणणें असेल, त्या मनुष्याचा समावेश होतो.

सदहू कायद्याच्या २०३ व्या कलमांत जास्त मजकूर दाखल करणें.

४. सदहू कायद्याच्या २०३ व्या कलमांत खालील मजकुर जास्त दाखल करावाः तो मजकुर येणेंप्रमाणें :—

"**खुलासा**.—कलमें २०१ व २०२ ह्यांतील आणि ह्या कलमांतील "अपराध" ह्या शब्दांत, जें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियांत केलें असतें तर ३०२ व्या, ३९५ व्या, ३९६ व्या, ३९७ व्या, ३९८ व्या, ३९९ व्या, अगर ४०२ व्या कलमाअन्वयें शिक्षेस पात्र झालें असतें, तें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियाच्या बाहेरील कोणत्याही जागीं केलें असेल तेव्हां त्याचाही समावेश होतो."

सदहू कायद्याच्या २१६ व्या कलमांत सुधारणा.

५. सदहू कायद्याच्या २१६ व्या कलमाचा दुसरा पारिग्राफ जो सन १८८६ चा आक्ट १० वा ह्याच्या २३ व्या कलमाअन्वयें जास्त दाखल केला आहे त्याऐवजीं खालील मजकुर जास्त दाखल करावाः तो मजकुर येणेंप्रमाणें :—

"कलम २१२ ह्यांतील आणि ह्या कलमांतील :—

(१) "अपराध" ह्या शब्दांत, जें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडियांत केलें असतें तर ह्या कायद्याच्या ३०२ व्या, ३९५ व्या, ३९६ व्या, ३९७ व्या, ३९८ व्या, ३९९ व्या, अगर ४०२ व्या कलमाअन्वयें शिक्षेस पात्र झालें असतें, तें कोणतेंही कृत्य ब्रिटिश इंडिया बाहेरील कोणत्याही जागीं केलें ह्मणून ह्मणणें असेल तेव्हां त्याचाही समावेश होतो; आणि कलम २१२ ह्याच्या आणि ह्या कलमाच्या कारणासाठीं, असें प्रत्येक कृत्य आरोपित मनुष्यानें ब्रिटिश इंडियांत केल्याप्रमाणें शिक्षेस पात्र आहे असें समजलें जाईल; आणि

(२) "आश्रय देणें" ह्या संज्ञेत, कोणत्याही मनुष्यास अन्न, कपडे, हत्यारें अगर युद्धसामुग्री पुरवणें ह्याचा आणि कोणत्याही मनुष्यास तो धरला न जावा ह्या साठीं कोणत्याही रीतीनें मदत करणें ह्याचा समावेश होतो."

सदहू कायद्याच्या २१६ व्या कलमानंतर नवीन कलम दाखल करणें.

६. सदहू कायद्याच्या २१६ व्या कलमानंतर खालील मजकुर दाखल करावा; तो मजकुर येणेंप्रमाणें :—

२१६ अ. दरवडा घालण्याच्या इरादानें अगर दरवडा घालून पांच अगर पांचाहून अधिक मनुष्य जमले आहेत असें माहीत असून अगर असें माहीत असण्यास कारण असून कोणत्याही मनुष्यानें जर त्या सर्व अगर त्यांपैकीं कोणत्याही मनुष्यांस अन्न, कपडे, हत्यारें अगर युद्धसामुग्री पुरविली तर त्यास सक्त मजुरीच्या कैदेची शिक्षा दिली पाहिजे व ती कैद सात वर्षेपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे, व तो मनुष्य दंडासही पात्र होइल.

दरवडेखोरांस आश्रय देण्याबद्दल शिक्षा.

"खुलासा.—असा दरवडा ब्रिटिश इंडियांत घातलेला असो अगर ब्रिटिश इंडिया बाहेर घातलेला असो, किंवा ब्रिटिश इंडियांत घालावयाचा असो अगर ब्रिटिश इंडिया बाहेर घालावयाचा असो, ह्या कलमाच्या कारणासाठीं तें महत्वाचें नाहीं.

## हेतु व करणें ह्यांचें निरूपण.

दरवडेखोर लोक मध्यहिंदुस्थानांतील व इतर संस्थानांमध्यें दरवडे घालून ब्रिटिश मुलकांत येऊन आश्रयास राहतात ह्यामुळें हा मसुदा रुजू करणें जरूर झालें आहे. ह्या लुटारू लोकांस कोणत्याही रीतीनें आश्रा देण्याचें बंद करण्यासाठीं इकडच्या कायद्यांत विशेष सक्तीचे ठराव असणें जरूर आहे.

तसेंच, ब्रिटिश हिंदुस्तानांत दरवडा घालणाऱ्या लोकांस मध्यहिंदुस्थानांतील व इतर संस्थानांतील त्यांच्या कटांतल्या लोकांकडून आश्रय देण्यांत येत असतो.

ह्या अरिष्टापासून ब्रिटिश प्रजेचें जसें नुकसान होत आहे तसें त्या संस्थानांच्या प्रजेचेंही नुकसान होत आहे. ह्मणून त्या अरिष्टाचें निवारण करण्याच्या कामीं तीं संस्थानें ब्रिटिश सरकाराला चांगली मदत करीत आहेत.

ही संधि साधून, "आश्रय देणें" ह्या संज्ञेचा काय अर्थ आहे त्याचा खुलासा केला आहे.

तारीख ३ आगस्ट १८९३.

फिल् पी. हाचिन्स.

(True Translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS